# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ३०६, ३०८ ते ३१६,३२७ ते ३३०, ३३४ ते ३४३, ३६५, ३६९, ३७९/२०१०-११ दिनांक :

१) श्री. अनिल भिमराव लादे (केस क्र. ३०६/२०१०-११)
उमा गृह निर्माण संस्था मर्यादित,मुरारजी पेठ, सोलापूर

२) श्री. रत्नकांत व्यंकप्पा निमाले, (केस क्र.३०८ /२०१०-११)
उमा गृह निर्माण संस्था मर्यादित,मुरारजी पेठ, सोलापूर

३) सदाशिव दिगंबर अनगरकर, (केस क्र. ३०९ /२०१०-११)
उमा गृह निर्माण संस्था मर्यादित,मुरारजी पेठ, सोलापूर

४) जयकुमार संगप्पा कनशेट्टी, (केस क्र.३१० /२०१०-११)
उमा गृह निर्माण संस्था मर्यादित,मुरारजी पेठ, सोलापूर

५) रेवणसिध्दाप्पा बंडेप्पा माळगे, (केस क्र. ३११ /२०१०-११)
उमा गृह निर्माण संस्था मर्यादित,मुरारजी पेठ, सोलापूर

६) पराग मल्लीकार्जुन नष्टे, (केस क्र. ३१२ /२०१०-११)
उमा गृह निर्माण संस्था मर्यादित,मुरारजी पेठ, सोलापूर

७) सिध्देश्वर भिमाशंकर भंडे, (केस क्र. ३१३ /२०१०-११)
उमा गृह निर्माण संस्था मर्यादित,मुरारजी पेठ, सोलापूर

८) दत्तात्रय गोरखनाथ जाधव, (केस क्र.३१४/२०१०-११)
उमा गृह निर्माण संस्था मर्यादित,मुरारजी पेठ, सोलापूर

९) नितीन मल्लीकार्जुन नष्टे, (केस क्र. ३१५ /२०१०-११)
उमा गृह निर्माण संस्था मर्यादित,मुरारजी पेठ, सोलापूर

१०) भारत भागवत पाटील, (केस क्र.३१६ /२०१०-११)
उमा गृह निर्माण संस्था मर्यादित,मुरारजी पेठ, सोलापूर

११) राजेश रामकृष्ण सिडागेद्दी, (केस क्र. ३२७/२०१०-११)
उमा गृह निर्माण संस्था मर्यादित,मुरारजी पेठ, सोलापूर

१२) धानय्या विरय्या कोडगे, (केस क्र. ३२८/२०१०-११)
उमा गृह निर्माण संस्था मर्यादित,मुरारजी पेठ, सोलापूर

१३) राजेंद्र नारायण साठे, (केस क्र. ३२९/२०१०-११)
उमा गृह निर्माण संस्था मर्यादित,मुरारजी पेठ, सोलापूर

१४) सुरेंद्र भालचंद्र कुलकर्णी, (केस क्र.३३०/२०१०-११)
उमा गृह निर्माण संस्था मर्यादित,मुरारजी पेठ, सोलापूर

१५) गिरीमल्लेश कृष्णा मेडीदार, (केस क्र.३३४/२०१०-११)
उमा गृह निर्माण संस्था मर्यादित,मुरारजी पेठ, सोलापूर

१६) मन्मथेश्वर ज्ञानेश्वर कानडे, (केस क्र. ३३५/२०१०-११)
उमा गृह निर्माण संस्था मर्यादित,मुरारजी पेठ, सोलापूर

१७) शिवाजी रामलिंग ननवरे, (केस क्र.३३६ /२०१०-११)
उमा गृह निर्माण संस्था मर्यादित,मुरारजी पेठ, सोलापूर

अर्जदार

१८) दत्तात्रय दामोदर पावले, (केस क्र.३३७ /२०१०-११)
उमा गृह निर्माण संस्था मर्यादित,मुरारजी पेठ, सोलापूर
१९) श्रीमती अंजली अनिल वैद्य, (केस क्र.३३८ /२०१०-११)
उमा गृह निर्माण संस्था मर्यादित,मुरारजी पेठ, सोलापूर
२०) सौ. सुरेखा सुरेश भुमकर, (केस क्र. ३३९ /२०१०-११)
उमा गृह निर्माण संस्था मर्यादित,मुरारजी पेठ, सोलापूर
२१) सौ. सोजर तानाजी मोरे, (केस क्र. ३४० /२०१०-११)
उमा गृह निर्माण संस्था मर्यादित,मुरारजी पेठ, सोलापूर
२२) महेंद्र विजयकुमार दिक्षित, (केस क्र. ३४१ /२०१०-११)
उमा गृह निर्माण संस्था मर्यादित,मुरारजी पेठ, सोलापूर
२३) सौ. महानंदा सुरेंद्र पंडित, (केस क्र.३४२ /२०१०-११)
उमा गृह निर्माण संस्था मर्यादित,मुरारजी पेठ, सोलापूर
२४) चंद्रकांत वसंत सुपेकर, (केस क्र. ३४३/२०१०-११)
उमा गृह निर्माण संस्था मर्यादित,मुरारजी पेठ, सोलापूर
२५) भालचंद्र पांडुरंगराव कुलकर्णी, (केस क्र.३६५ /२०१०-११)
उमा गृह निर्माण संस्था मर्यादित,मुरारजी पेठ, सोलापूर
२६) कुरनावळ नागनाथ काशीनाथ, (केस क्र. ३६९ /२०१०-११)
उमा गृह निर्माण संस्था मर्यादित,मुरारजी पेठ, सोलापूर
२७) सौ. विजया भगवान गावडे, (केस क्र. ३७९/२०१०-११)
उमा गृह निर्माण संस्था मर्यादित,मुरारजी पेठ, सोलापूर

**विरुध्द**

१) कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,
सं व सु मंडळ कार्यालय, ऊर्जा नगर, सोलापूर
२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
शहर विभागीय कार्यालय, सोलापूर
३) उप कार्यकारी अभियंता,
म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
शहर अ उप विभागीय कार्यालय, सोलापूर

विरुध्द पक्षकार

कोरम : १) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
२) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## संयुक्त न्याय निर्णय

श्री. जी.सी. लेले, सदस्य, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

वरील २७ ग्राहकांनी अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, सोलापूर यांचेकडे व नंतर मंचाकडे तक्रार दाखल केल्या आहेत. सर्व तक्रारदार सोलापूर येथील जुनी मिल कंपाऊंड, टि.पी. ४ फायनल प्लॉट नं. १२५/२ मधील उमा गृह निर्माण संस्थेत कायमपणे राहणारे आहेत. सदरील तक्रारदारांच्या मागणीचे स्वरुप एकच आहे. तसेच सर्व तक्रारदार एकाच ले आऊटमध्ये रहात असल्याने दि. १०.२.२०११ रोजी सोलापूर सर्कल येथे एकत्रित सुनावणी घेतली. सुनावणीच्यावेळी सर्व ग्राहक उपस्थित होते. तसेच नोडल ऑफीसर श्री. प्रसाद, शहर कार्यकारी अभियंता श्री. कोळप व अन्य अधिकारी उपस्थित होते. मंचापुढे दाखल जादा तक्रार तसेच उभयतांकडून कागदपत्रे दाखल होण्यास झालेला विलंब यामुळे विहित ६० दिवसांच्या मुदतीत न्याय निर्णय झालेला नाही.

उमा सहकारी गृह निर्माण संस्था मर्यादित, सोलापूर या संस्थेतील सभासद ग्राहकांनी वि.प.कडून तात्पुरत्या स्वरुपातील जोडणी घरगुती कारणसाठी वेगवेगळया वेळी घेतली आहे. मंचापुढे २७ ग्राहकांचे अर्ज निर्णयासाठी दाखल झालेले आहेत. २७ ग्राहकांना वि.प.ने अर्जदाराच्या मागणीप्रमाणे तात्पुरती वीज जोडणी दिली व आयोगाने ठरवून दिलेले टेरीफ आदेशाप्रमाणे बिलाची आकारणी केली. ती ग्राहकाने वेळच्यावेळी भरलेली आहे, हि वस्तुस्थिती वि.प.ने नमूद केलेली आहे. L.T. VII प्रमाणे केलेली वीज आकारणी चुकीची आहे. आमचा वापर घरगुती स्वरुपाचा आहे. त्यामुळे आकारणी घरगुती स्वरुपाची होणे योग्य आहे. त्यामुळे L.T. VII स्वरुपात बिलातून जादा घेतलेली रक्कम परत करावी अशा स्वरुपाची सर्वसाधारण तक्रार आहे.

वि.प.कडे ’ क्ष ’ नमुन्यातील अर्ज दाखल झाल्यावर सर्व अर्जदारांना एकत्रित बोलावून सुनावणी घेतलेली आहे. अर्जदारांच्या मागणी प्रमाणे पुरवठा व आकारणी केलेली असल्याने रक्कम परत देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तसेच ग्राहकांनी घरगुती कारणासाठी वापर यासाठी आवश्यक कागदपत्रासह अर्ज केलेस कायमस्वरुपी जोडणी देण्याची कार्यवाही करावी अशा पध्दतीचा निर्णय अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, सोलापूर ने दिला आहे.

दि. १०.२.२०११ च्या सुनावणीच्यावेळी उभयतांनी वरील भूमिकेचाच पुनरुच्चार केला. उभयतांना अधिक स्पष्टतेसाठी कागदपत्रे हजर करण्याची मागणीप्रमाणे मुदत दिली. तशी कागदपत्रे दाखल झालेली आहेत.

मुळ तक्रार अर्ज, सोबतची कागदपत्रे, सुनावणी दरम्यानची कथने, अंतर्गत कक्ष सोलापूरचा निर्णय. वि.प.कडून प्राप्त झालेला मुद्‌देनिहाय अभिप्राय व त्यासोबतची कागदपत्रे या सगळयांचा एकत्रित विचार करतां, मंचापुढे निर्णयासाठी पुढील मुद्‌दे उद्‌भवतात.

| | |
|---|---|
| मुद्‌दा क्र. १ | घरगुती वापरासाठी कायमस्वरुपी कनेक्शन देण्याऐवजी तात्पुरते स्वरुपाचे कनेक्शन देणे योग्य आहे काय ? |
| उत्तर : | नाही. कायमस्वरुपी कनेक्शन देणे योग्य आहे. |
| मुद्‌दा क्र. २ | मग अशा स्वरुपातची जोडणी वि.प. कडून का दिली गेली ? |
| उत्तर : | तसा खुलासा अगर कागदोपत्री पुरावा वि.प.ने हजर केलेला नाही. |
| मुद्‌दा क्र. ३ | घरगुती दराने आकारणी करणे योग्य आहे काय ? तसेच परतावा देणे योग्य आहे काय ? |
| उत्तर : | होय. अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, सोलापूर यांच्या आदेशाप्रमाणे A1 मागणी अर्ज दाखल तारखेनंतर घरगुती दराने आकारणी करुन परतावा देणे योग्य आहे. |

मुद्‌दा क्र. ४ आदेश ?

अंतिम आदेशाप्रमाणे

## कारणमिमांसा

सदरचे सर्व अर्जदार फायनल टि.पी. ४, प्लॉट नं. १२५/२, मुरारजी पेठ, जुनी मिल कंपाऊंड, सोलापूर या जागेतील आहेत. सदरची जागा जुन्या मिलची होती. सदरच्या जागेची विक्री केली व त्यात उमा सहकारी गृह निर्माण संस्था अस्तित्वात आली. सदरच्या संस्थेने रितसर ले आऊट मंजूर करुन घेवून संबंधित तक्रारीतील अर्जदारांना ' प्लॉटचे ' हस्तांतरण केलेले दिसून येते. तशी अलॉटमेंट लेटर सर्व संबंधितांना दिलेली आहेत. पुढे जावून के.के. बिल्डर्स अँड डेव्हलपर्स कडून नमुन्यात ठरल्याप्रमाणे बंगले बांधून दिलेले आहेत. तशी कागदपत्रे ग्राहकांनी मंचापुढे हजर केलेली आहेत. जागेचे अलॉटमेंट लेटर, बंगल्याचे बांधकाम पूर्ण करुन बंगला ताब्यात दिलेले पत्र तक्रारीत हजर केलेले आहे. सदरच्या गृहनिर्माण संस्थेचे सर्व सभासदांना वीज जोडण्या सुलभ पध्दतीने देता याव्यात म्हणून वि.प.कडून इन्फ्रास्ट्रक्चरचे काम मंजूर करुन घेतलेले आहे. त्याचा क्रमांक SE/SURC/T/JE-I/७४/४३२ दि. ९.७.२००७ under T.S.E.No. SE/SURC/T/ORC/५० of ०७-०८ असा आहे. तसेच Revised Estimate हि मंजूर केलेले दिसते. सदरचे काम ८०% पेक्षा जास्त पूर्ण झाल्याचे निवेदन वि.प.ने केलेले आहे. तसेच उमा गृह निर्माणच्या चेअरमनने ' ना हरकत ' दाखला घेतलेल्यांनाच जोडणी द्यावी असे पत्र दि. २१.१.२०११ रोजी वि.प.स दिल्याचे दिसून येते. हे सर्व खरे असतांना कोणत्या कारणासाठी तात्पुरते स्वरुपाचे कनेक्शन मागितले व वि.प.ने दिले याचा विचार करावा लागेल. सदरच्या जागेत के.के. बिल्डर्स यांची अनुक्रमे क्र. ३३०२४१६०६७१६ व ३३०२४१६६७१११ अशी कनेक्शन आहेत व त्यावर थकबाकी आहे म्हणून सदरच्या जोडण्यांचा वीज पुरवठा खंडीत केला होता. जुन्या जागेत जुन्या मालकाची थक बाकी असतांना नवीन जोडण्या देणे योग्य होणार नाही. मात्र आलेल्या अर्जास न्याय द्यावा लागेल म्हणून उभयतांच्या विचारानेच तात्पुरत्या जोडण्यांचा विचार पुढे आला असावा. सदर के.के. बिल्डर्स व वि.प. यांची परस्परातील जुनी येणी अगर देणी हिशोब व्हावयाचा आहे असे कागदपत्रावरुन दिसून येते.

श्री. मनोज संजीव शिराळे ग्राहक क्र. ३३०२४८५४१८७३ या ग्राहकास जुलै २००९ पासून घरगुती दराने वीज प्रवाह प्लॉट नं. १२५/२ मध्ये चालू आहे. सदरचा ग्राहक उमा सहकारी गृहनिर्माण संस्थेचा सभासद आहे व त्याच घरास वि.प.ने जोडणी दिली आहे. हे वि.प.चे धोरण 'एकास एक न्याय व दुस-यास दुसरा ' या प्रमाणे् आहे. आपल्या सोईने व मर्जीने वि.प.चे वागणे दिसून येते. सदर २७ ग्राहकांची वैयक्तीक स्तरावर तक्रार हाताळल्यावर असे दिसून येते की, तक्रार क्र. ३०९ व ३१० मध्ये दि. ५.४.२००९ ते ४.५.२००९ या एक महिन्यासाठी विद्युत पुरवठा मागितला आहे. तथापि तो आजमितीपर्यंत चालू आहे. तर तक्रार क्र. ३३० व ३३४/२०१० मध्ये सदर गृह निर्माण संस्थेने जोडणी देण्यास सहमती दर्शविली आहे. तसेच बहुतेक तक्रारदाराकडून व्होल्टेज कमी जास्त झाल्यास तक्रार करणार नाही, सर्व्हीस वायर, जी.आय. तार व इतर साहित्य स्वखर्चाने आणेन, डिपॉझीट भरणेस तयार आहे व सर्वात महत्वाचे मजला तात्पुरती वीज जोडणी हवी आहे अशा आशयाचे अर्ज सर्वांच्याकडून घेतलेले आहेत. असे लिहून घेण्याची कोणती गरज होती हे समजत नाही. तसेच तात्पुरते कनेक्शन केव्हा, कोणाला, कोणत्या कारणासाठी व महत्वाचे किती कालावधीसाठी हे आयोगाने निश्चित करुनही वि.प.ने तात्पुरते कनेक्शन का दिले याचा पाठपुरावा करता असे लक्षात येते की, प्लॉट नं. १२५/२ मधील जागेचा मालक व वि.प.यांचे विजेचे बील, जागेचे भाडे, वहिवाट यासाठी तक्रारी चालू होत्या व आहेत.

अशा परिस्थितीत वीज मागणी आल्यावर जोडणी नाकारणे अशक्य आहे, तसेच वि.प.चे वरिष्ठही नाराज होवू नयेत म्हणून मध्यममार्ग काढून तात्पुरत्या जोडण्या दिल्या आहेत. त्याची बील आकारणी त्यामुळे तात्पुरत्या जोडणीसाठीची झाली आहे. संबंधित अर्जदारांनाही गरज असल्याने त्यांनीही तशी मागणी नोंदविली आहे. तथापी सोबत तक्रारीत नमूद ग्राहकांनी मालकीहक्काचे आवश्यक कागद लावलेले आहेत. त्यामुळे कायमस्वरुपी घरगुती जोडणी व त्याप्रमाणे आकारणी करणे योग्य आहे. तथापी सदर सर्व ग्राहकांनी वि.प.च्या अंतर्गत कक्षाकडे तक्रार केल्यावरच त्यांची काय मागणी आहे हे दिसून येते. त्यामुळे तक्रारीच्या आधीपासून जोडणी देणे वा परतावा देणे अयोग्य असल्याने अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष यांच्या निर्णयाप्रमाणे A1 मागणी अर्ज दाखल तारखेपासून घरगुती दराची आकारणी करुन बिलातून परतावा करावा अशा विचारापर्यंत मंच पोहोचला आहे. वैयक्तीक स्वरुपात तक्रारदारांना आकारणी तपशील व रक्कम समजावून सांगावी. गृह निर्माणच्या चेअरमननी आमच्या ' ना हरकत ' दाखल्याशिवाय जोडणी देवू नये असे वि.प.स कळविले आहे. तथापि मालकीहक्काचे सर्व कागद अर्जदारांनी दिले असल्याने तसेच कांही अर्जदारांनी 'ना हरकत 'पत्रेही हजर केली. चेअरमन गृह निर्माण यांच्या पत्राचा विचार करता येणार नाही. बांधकाम पूर्ण झाल्याचे दाखलेहि जोडलेले आहेत. तसेच उमा गृह निर्माण चेअरमन यांनी वितरण यंत्रणा उभारणीचे काम ८०% पेक्षा जास्त पूर्ण केल्याचे व उर्वरीत काम नजिकच्या काळात त्वरेने पूर्ण करत असल्याचे मंचाचे सदस्य सचिव यांना वि.प.ने सांगितले आहे. या सर्व बाबींचा एकत्रित विचार करुन आयोगाचे विनियमातील तरतुदी व वेळोवेळीच्या टेरिफ ऑर्डर याचा विचार मंचाने केलेला आहे. सध्यस्थितीत बिलाची आकारणी व परतावा देणेकामी कोणतीही अडचण दिसत नाही. **उमा गृह निर्माणने पायाभूत यंत्रणा उभी केल्यावर त्यांना सदरची नव्याने केलेल्या यंत्रणेतून वि.प.ने जोडणी जोडून द्यावीत असा आदेश मंच देत आहे.** त्यासाठी ग्राहकाला आवश्यक तो खर्च करावा लागेल.

सुरुवातीस सर्व ग्राहकांना वरील नमूद जोडणीमधूनच पुरवठा होत होता. परंतु दरवेळी थकबाकी व इतर हिशोबासाठी होणारा व्यत्यय टाळणेसाठी मध्यममार्ग निवडला. आजमितिस वि.प.ने घेतलेली भूमिका ' मागणी प्रमाणे पुरवठा ' हि चुकीची वाटते. कारण आयोगाने टेरीफ ऑर्डरमध्ये ठरवून दिल्याप्रमाणे जास्तीतजास्त १ वर्षासाठी तात्पुरते कनेक्शन देण्याची तरतूद आहे. तीही तरतूद करतांना अशी जोडणी कोणास देता येईल हे हि स्पष्ट केले आहे. त्यामुळे सदर बाबीचा विचार करतां, वि.प.ची कृती चुकीची आहे. तसेच जोडणी दिलेल्या तारखेपासून परतावा मागणे हेहि वास्तवाला धरुन नाही. त्यामुळे अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, सोलापूर यांच्या आदेशाप्रमाणे A1 मागणी अर्ज दाखल तारखेपासून घरगुती दराने आकारणी करुन परताव्याची रक्कम पुढील बिलातून समायोजन करणे योग्य आहे. ग्राहकांनी नव्याने तपासणी अहवाल सादर करावेत तसे अहवाल प्राप्त झालेल्या ग्राहकांनाच तसा परतावा द्यावा. गृहनिर्माणच्या चेअरमनने घेतलेली कागदोपत्री हरकत मंच फेटाळत आहे. कारण प्रत्येक ग्राहकाकडे आयोगाने पारीत केलेल्या विनियमातील तरतुदीनुसार मालकीहक्काचे सर्व कागद आहेत ते वि.प.स दिलेले आहेत. त्यामुळे वि.प.ने अंतर्गत कक्ष यांच्या निर्णयाप्रमाणे A1 मागणी अर्ज दाखल तारखे पासून घरगुती दराने आकारणी करावी व बिलातून परतावा द्यावा असा आदेश मंच पारीत करीत आहे.

सदर गट क्र. १२१/२ उमा गृह निर्माण मधीलच एक सभासद ग्राहक श्री. अंकूश सिताराम गायकवाड यांनी क्र. ४७/२०१० मंचापुढे तक्रार दाखल केलेली होती त्याचा न्याय निर्णय मंचाने दि. २८.१०.२०१० रोजी केला. त्या संदर्भात वितरण कंपनी सोलापूर मंडल यांनी मंचाच्या न्याय निर्णयाबाबत मा. ना. उच्च न्यायालय, मुंबई यांचेसमोर W.P. स्टँप नं. ३०९३७ ने पिटीशन मंचामध्ये दाखल केले असल्याचे आपल्या पत्र क्र. EE/SUR/U/T/1926 Dated 5.4.2011 ने कळविले आहे. तथापी मा. ना. उच्च न्यायालयाने पुढील कोणताही आदेश दिला नसल्यानेच सदर तक्रारी संदर्भात न्याय निर्णय आदेश केलेला आहे.

## आदेश

१) अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, सोलापूर यांचा निर्णय कायम करण्यात आला आहे.

२) अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, सोलापूर यांच्या आदेशानुसार A1 दाखल झालेल्या तारखेपासून २७ तक्रारदारांना घरगुती स्वरुपाची कायमस्वरुपी जोडणी वि.प.ने द्यावी.

३) सदरच्या तारखेपासूनची घरगुती दराने आकारणी करुन जादा घेतलेली रक्कम बिलातून समायोजन करावी.

४) रकमेचा तपशील ग्राहकास व मंचास कळवावा.

५) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

६) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बाद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

( जी. सी. लेले )
सदस्य

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :